नियमित दरखास्त क्र. २३/ २०१३
आशिकहुसेन बोहरी
वि.
अनंत घोडके

## आदेश निशाणी क्र.१ वर

संचिकेचे अवलोकन केले. नियमित दिवाणी दावा क्र.१५९/२०१२ मध्ये दि.१६.१०.२०१२ रोजी दिलेल्या हुकुमनाम्याचे अंमलबजावणीसाठी प्रस्तुत दरखास्त दाखल करण्यात आलेली आहे. धनको क्र.१ ते ६ यांचे तर्फे नमुद दरखास्त वकील श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी यांनी दाखल केलेली आहे. त्यामध्ये ऋणको क्र.२ मुर्तजा हकीमुद्दीन बोहरी यांना नोटीसची बजावणी झालेली नाही. त्यांच्या स्टेप्स घेण्यासाठी प्रकरण प्रलंबित आहे.

२. दरम्यान दिनांक ३०.०१.२०१९ रोजी नि.क्र.३१ प्रमाणे धनको क्र.३ ते ५ यांचे तर्फे वकील श्री.आर.डी.पोरे यांनी त्यांचे वकीलपत्र दाखल केले आहे. सदर वकीलपत्र दाखल करताना पूर्वीचे नमुद धनको यांचे वकील श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी यांची नाहरकत घेतलेले दिसुन येत नाही.

३. प्रकरणामध्ये एकुण ६ धनको आहेत. सर्व धनको यांचेसाठी एकच वकील असणे गरजेचे आहे. तरच या प्रकरणाचे कामकाज सुरळीतपणे व व्यवस्थितरित्या पुढे चालु शकेल. आता उर्वरीत ऋणको क्र.१,२ व ६ यांचे वकील श्री.व्ही.व्ही.कुलकर्णी हे मागील बरेच तारखेपासुन गैरहजर आहेत. नमुद धनको क्र.१ व २ हे मयत आहेत असे मला धनको क्र.३ ते ५ यांचे वकील श्री.आर.डी.पोरे यांनी सांगितले. सर्व धनको यांचेतर्फे एकच वकील असल्याशिवाय प्रकरणाचे कामकाज पुढे चालवणे योग्य होणार नाही.

## आ दे श

१. धनको क्र.३ ते ५ यांचे वकील श्री.आर.डी.पोरे यांना निर्देश देण्यात येत आहे की, पुढील तारखेपर्यंत त्यांनी धनको क्र.१, २ व ६ यांचे तर्फे वकीलपत्र दाखल करावे अथवा प्रकरणात पुढील आवश्यक त्या स्टेप्स घ्यावेत.

२.	पुढील तारखेपर्यंत योग्य त्या स्टेप्स न घेतल्यास प्रकरणात योग्य ते आदेश करण्यात येतील.

३.	धनको यांचे वकील श्री.आर.डी.पोरे यांच्या सहमतीने प्रकरणाची पुढील तारीख दि.१६.०३.२०२० देण्यात येत आहे.

Sd/-

दिनांक : ०३/०२/२०२०

( श्रीकृष्ण हरिभाऊ इनामदार )

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

<u>**C E R T I F I C A T E**</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/ Order is same word to word as per the original Judgment.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| a | Name of the Stenographer | : | B.R.Kondekar |
| b | Court | : | C.J.S.D. Pandharpur. |
| c | Date of Order | : | 03.02.2020 |
| d | Order signed by P.O. on | : | 03.02.2020 |
| e | Order uploaded on | : | 04.02.2020 |